

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २२ (प्रतिनिधी) - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेतील ३२ विद्यार्थ्यांची २०२४ - २५ या शैक्षणिक वर्षात परिसर मुलाखतीत नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे.

विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाद्वारे २०२४ - २५ या शैक्षणिक वर्षात विविध प्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठात परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले. यात रसायनशास्त्र प्रशाळेतील ३२ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये चांगल्या वार्षिक पॅकेजेसवर निवड झाली आहे.

यात वैष्णवी काळे, निकीता पाटील, समृध्दी पाटील, कल्याणी देसले यांची (छत्रपती संभाजीनगर येथील लाईफलाईन मेडीकल डिव्हायमेम प्रा.लि.) चेतन शिंदे यशोदीप मराठे यांची (नोव्हा ॲग्री सायन्स प्रायव्हेट लिमिटेड तेलंगणा), गौरव बास्कर (उमिया फ्लेक्सिफोम प्रा. लि. अहमदाबाद, गुजरात), मानसी पाटील (एसीएस आंतरराष्ट्रीय इंडिया प्रा.लि., पुणे), निखील भोजणे (मेडली फार्मास्युटिकल्स लिमिटेड, मुंबई), निलेश पाटील (यु एस व्ही खाजगी मर्यादित दमण दिव), प्रसाद पाटील (केवा फ्रेग्रन्सेस प्रा.लि. मुंबई), शेख रहिम शेख कलिम (इनोव्हासिंथ टेक्नॉलॉजीज (इंडिया) लिमिटेड, खोपोली) शार्दुल प्रकाश, नेफाडे स्नेहा राजेंद्र (साय एज ॲबसट्रॅक्ट्स, पुणे), शुभम राठोड, रोहन राजपूत, निलेश निकम यांच्या (सुप्रिम पेट्रोकेम लिमिटेड, रायगड), सुशिल मराठे, ऐश्वर्या पाटील (ड्रायकेम इंडिया प्रायव्हेट लि., नवी मुंबई), तुषार चौधरी, विजयराज जाधव (एम.पी.डी. इंडिस्ट्रोज प्रा.लि.इंदौर) विशाल निकम (मॅकडमिड एन्थोन इंडिया, पुणे), वैभव गिरासे (ओरिकेम हेल्थ केअर, प्रा. लि. हरियाणा), समृध्दी पाटील, वैष्णवी काळे, कल्याणी देसले, निकिता पाटील (लाईफ लाईन मेडिकल डिव्हायसेस, संभाजीनगर) जागृती पाटील, हर्षदा गायकवाड (टाटा ऑटोमोबाईल डिव्हीजन, चाकण पुणे), डॉ. विकास पाटील (ठाकोर रिडकटन प्रायव्हेट लिमिटेड गुजरात), डॉ. अरुण काळे (अंशुल स्पेशलिटी मॉलेक्युस प्रा. लि. मुंबई तर दिग्विजय गिरासे यांची एक्सट्रोल पेट्रोकेमिकल्स इंडस्ट्रीज एलएलसी, यु ए इ या आंतरराष्ट्रीय नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आहे.

विद्यापीठातील रसायनशास्त्र प्रशाळेत अद्यायावत दर्जेदार अभ्यासक्रम शिक्षकांचे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष व संशोधन प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना नामांकित केमिकल इंडस्ट्रीज मध्ये तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये आणि राष्ट्रीय नामांकित संशोधन संस्थांमध्ये रोजगार आणि संशोधनाच्या संधी मिळत असल्याची माहिती रसायनशास्त्र शाळेचे संचालक प्रा. दीपक दलाल यांनी दिली आहे.

निवड झालेल्या विद्यार्थी विद्यार्थिनीचे कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील रसायनशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. दिपक दलाल, पॉलिमर केमिस्ट्रीचे विभाग प्रमुख प्रा.विकास गीते, रसायनशास्त्र प्रशाळेचे समन्वयक डॉ. अमरदिप पाटील यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तर नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. उज्वल पाटील, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी परिसर मुलाखतीचे व्यवस्थापन केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि.२२ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या समाजकार्य (एम.एस.डब्ल्यू.) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्व. शिवराम दिला पाटील व स्व. शांताबाई शिवराम पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ सुवर्णपदक देण्यात येणार आहे.

विद्यापीठास जळगाव येथील प्रा.डॉ. पी.एस. पाटील, समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर यांनी स्व. शिवराम दिला पाटील व स्व. शांताबाई शिवराम पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ विद्यापीठास समाजकार्य (एम.एस.डब्ल्यू.) परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास सुवर्णपदक देण्यासाठी आवश्यक असलेला धनादेश कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्याकडे दि. २१ जुलै, २०२५ रोजी सुपूर्द केला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, प्रा.डॉ.पी.एस. पाटील, डॉ. सौ. कविता पाटील, प्रा. जगदीश सोनवणे, प्रा. आशुतोष पाटील, प्रा. समीर नारखेडे, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील उपस्थित होते.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २२ जुलै, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता